# प्रमाणपत्र

श्री.श्रीधर भाऊसाहेब शिंदे यांनी इतिहास विषयातील एम.फील पदवीसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांजकडे सादर करावयाचा **"डॉ.आंबेडकर यांची मागासवर्गीय समाजाच्या शिक्षणा संबंधीची दृष्टी "**

(DR.AMBEDKAR'S VISION & EDUCATION OF BACKWARD COMMUNITY )

हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. सदर प्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठास पदवी किंवा पदवीकेसाठी सादर केलेला नाही. श्री.शिंदे यांनी लिहीलेला प्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली केलेल्या संशोधनावर आधारित आहे.

*डॉ. सौ. पद्मजा पाटील*

(एम.ए.बी.एड.एम.फील,पी.एच.डी.)

**संशोधन मार्गदर्शक,**

इतिहास विभाग,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

स्थळ - कोल्हापूर

दि. २० / ६ /२००५

# निवेदन

मी या निवेदनाद्वारे असे जाहिर करतो की, **"डॉ.आंबेडकर यांची मागासवर्गीय समाजाच्या शिक्षणा संबंधीची दृष्टी "** हा प्रबंध माझ्या संशोधन मार्गदर्शिका डॉ. सौ. पद्मजा पाटील यांच्या मार्गदर्शखाली मी स्वत: लिहिला असून सदर प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विषयातील एम.फील. पदवीसाठी सादर केला आहे.

*श्रीधर भाऊसाहेब शिंदे*

अभ्यासक

स्थळ - कोल्हापूर

दि.२० /०६/२००५

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

# ऋण निर्देश

' डॉ.आंबेडकर यांची मागासवर्गीय समाजाच्या शिक्षणा संबंधीची दृष्टी' हा विषय संशोधनासाठी निवडल्या पासून प्रस्तुत प्रबंध पूर्ण करेपर्यंत ज्या अनेक व्यक्ती व संस्था यांचे मला सहकार्य, मार्गदर्शन आणि उत्तेजन लाभले त्या सर्वांचे अंत:करणपूर्वक आभार मानणे हे मी माझे आद्य कर्तव्य समजतो. कारण त्यांच्या सहकार्याशिवाय माझे संशोधन कार्य सिध्दीस गेले नसते याची मला जाणीव आहे.

सर्व प्रथम मी माझ्या संशोधन मार्गदर्शिका डॉ.सौ.पद्मजा पाटील यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतो.त्यांनी मला संशोधन विषयाची निवड व त्याचा अभ्यास याबाबत बहुमोल मार्गदर्शन केले आणि सतत उत्तेजन देवून ,सदैव सहकार्य केले.त्यांचे ऋण मला विसरता येणार नाही.तसेच या प्रबंधासाठी इतिहास विभाग प्रमुख डॉ.अरुण भोसले,डॉ.एम.ए.लोहार, डॉ.बी.डी.खणे यांचे सहकार्य व प्रोत्साहन मिळाले त्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

आमच्या यशवंत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा. आ. प्रा. शरद पाटील, मिरज महाविद्यालयचे प्राचार्य डॉ.जे.बी.चौगुले, उपप्राचार्य पी.ए.पाटील, इतिहास विभाग प्रमुख प्रा.सौ.सुवर्णा पाटील यांची प्रेरणा आणि प्रोत्साहनामुळे व सहकार्याने हे काम पूर्णत्वाकडे नेता आले. त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार !

प्रस्तुत एम.फील. या शोध निबंधासाठी पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई चे व्यवस्थापकीय मंडळ, सिध्दार्थ कला आणि विज्ञान महाविद्यालय, मुंबईचे ग्रंथपाल, तसेच पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या विविध महाविद्यालयामधील ज्ञात अज्ञातांनी बहुमोल सहकार्य केले. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील पुरातत्व विभागातील डॉ.आंबेडकरांच्या कार्याची माहिती देणारी हस्तलिखीते उपलब्ध करून दिली.याबद्दल डॉ.बापूसाहेब माने आणि मिरज महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल व अन्य कर्मचारी या सर्वांचा मी सदैव ऋणी आहे.

स्वतः अशिक्षित असूनही मुलांना शिक्षण देण्यासाठी आयुष्याची पराकाष्टा करणारे माझे वडील श्री.भाऊसाहेब व आई सौ.जयवंती तसेच स्वतःचे शिक्षण बंद करुन मला शिक्षणास प्रोत्साहन देणारा माझा ज्येष्ठ बंधू विद्याधर, वहिनी सौ.वंदना, बहीण श्रीमती लता, व सौ.अलका यांचे सहकार्य आणि पत्नी सौ.शैलजा या सर्वांचे सहकार्य व प्रोत्साहन मिळाले. शिक्षणासाठी नेहमीच प्रेरणा देणारे माझे मामा श्री.भास्कर, श्री.ईश्वर, श्री.विश्वास शिंदे, तसेच चि.प्रतिक, कु.दीक्षा,चि.सुभाष, चि.पंकज या सर्वांच्या प्रेमामुळेच हा छोटेखानी प्रबंध पूर्ण करु शकलो.

या लघुशोध निबंधाच्या कामी मला प्रा.अविनाश भोरे, प्रा.मिलींद गुरव, प्रा.अरूण पाचोरे, प्रा.संजय वाईंगडे,प्रा.राजेंद्र जेऊर,प्रा.खरात,प्रा.संजय पाटील तसेच मिरज महाविद्यालयातील सर्व सहकारी मित्रांचे सहकार्य लाभले त्यांचाही मी आभारी आहे. या प्रबंधाच्या संगणकीय लेखनाचे काम श्री. सुनिल छत्रे यांनी अत्यंत अल्पावधीत पूर्ण करुन दिले या सर्वांचाच विनम्र आभारी आहे.

स्थळ - कोल्हापूर

तारीख - ३० /६/२००५

- श्रीधर भाऊसाहेब शिंदे

# प्रस्तावना

अस्पृश्यता हा भारतीय समाजाला लागलेला कलंक आहे.वैदिक परंपरेने चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेची निर्मिती केली.त्यामुळे भारतीय समाजामध्ये कमालीची विषमता निर्माण झाली.वर्ण-जात-धर्माच्या आधारावरती 'शुद्र' या चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील चौथ्या वर्णाला हक्क आणि अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले.त्याने विद्या शिकू नये, धनसंचय करू नये.शस्त्रधारण करू नये असे मनुनिर्मित प्रस्थापित धर्मग्रंथांनी सांगितले होते.यावरती पहिला हल्ला गौतम बुध्दांनी केला.'ज्ञान'म्हणजे 'प्रकाश' ही ज्ञानाची व्याख्या बुध्दांनी केली व सामाजिक समतेचा पुरस्कार केला.चातुर्वर्ण्याचं ग्रहण लागलेल्या भारतीय समाज व्यवस्थेबाबत अतिशय तिखट प्रतिक्रिया महात्मा जोतिबा फुले यांनी व्यक्त केली, तर लहानपणापासून अस्पृश्यतेच्या दाहक चटक्यांनी होरपळून निघालेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अन्यायी समाजव्यवस्था बदलण्यासाठी आपल्या ज्ञानाचा उपयोग सामाजिक परिवर्तनासाठी केला. परंपरेने 'गावकुसाबाहेर' ठेवलेल्या समाजाला स्वाभिमानाने जगायचे असेल तर प्रथम त्याला शिक्षण दिले पाहिजे. यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपली उभी हयात खर्ची घातली. म्हणूनच आज अस्पृश्य, बहिष्कृत, मागासवर्गीय किंवा दलित या विविध नावांनी संबोधलेल्या लोकांना समाजामध्ये सन्मानाने जगता येत आहे. याचे सर्व श्रेय डॉ.आंबेडकरांना आणि त्यांच्या शैक्षणिक विचारधारेला जाते. म्हणून डॉ.आंबेडकरांच्या शैक्षणिक विचार व कार्य पहाणे महत्वाचे ठरते.

हा लघुशोध प्रबंध एकूण पाच प्रकरणामध्ये विभागण्यात आला आहे.पहिल्या प्रकरणामध्ये मागासवर्गीय समाजाच्या १९२०पर्यंतच्या शैक्षणिक स्थितीचा आढावा घेतला आहे. यामध्ये बौध्दकालीन शिक्षण,मध्ययुगीन कालीन शिक्षण, ब्रिटीश कालीन मागासवर्गीयांचे शिक्षण, पेशवेकाळातील मागासवर्गीयांचे शिक्षण,मिशनऱ्यांचे शैक्षणिक कार्य, महात्मा फुले, गोपाळबुवा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, छत्रपती शाहू महाराज आणि कर्मवीर भाऊराव पाटील, इ.च्या मागासवर्गीयांच्या बाबतीत केलेल्या शैक्षणिक कार्याचा थोडक्यात आढावा घेतला असून या सर्वांच्या विचारधारेवरून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांची बैठक तयार झाली. याची थोडक्यात मांडणी केली आहे.

दुसऱ्या प्रकरणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार मांडण्यात आले असून त्यांचे प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, स्त्रियांचे शिक्षण, वसतीगृह, याबाबतीत त्यांनी शिक्षण अनुदान आयोग विधेयकावर केलेली चर्चा, मुंबई प्रेसिडेन्सी मधील दलित वर्गाच्या शैक्षणिक अवस्थेविषयी केलेले निवेदन, मुंबई विद्यापीठ दुरूस्ती विधेयकावर केलेली चर्चा, इ.बाबींचा या प्रकरणात उहापोह केलेला आहे.

तिसऱ्या प्रकरणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांची फलश्रुती कशी झाली हे सांगितलेले असून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९४५मध्ये स्थापन केलेली पीपल्स एज्युकेशन सोसायटी आणि त्यांनी मुंबई व औरंगाबाद या ठिकाणी स्थापन केलेली या संस्थेची महाविद्यालये, त्यांची गुण वैशिष्ट्ये यांची चर्चा केलेली आहे.१९४५ नंतर मागासवर्गीयांच्या शैक्षणिक प्रगतीत या संस्थेचे योगदान महत्वपुर्ण ठरले आहे.

प्रकरण क्रमांक चार मध्ये डॉ.आंबेडकरांच्या शिक्षण कार्यात मदत करणारे त्यांचे सहकारी डी.जी.जाधव, एम.बी.चिटणीस, आर.आर.भोळे, बी.एच.वराळे, एस.एस.रेगे, इ.च्या कार्याचा आढावा घेतला आहे. डॉ.आंबेडकरांच्या शैक्षणिक चळवळीला मदत करणारा दुसरा महत्वपूर्ण घटक म्हणजे त्यांनी चालविलेली वृत्तपत्रे, त्यामध्ये मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुध्द भारत या वृत्तपत्रांनी केलेल्या शैक्षणिक कार्याची माहिती दिली आहे.या वृत्तपत्रातून डॉ.आंबेडकरांचे शैक्षणिक विचार त्यात झालेले बदल यांचा सहज मागोवा घेता येतो.

प्रकरण क्रमांक पाच मध्ये डॉ.आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांची व त्या अनुषंगाने केलेल्या कार्याचे मूल्यांकन करून निष्कर्ष काढले आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाने व त्यांनी सुरु केलेल्या पीपल्स एज्यूकेशन सोसायटी मुळे शतकानुशतके गुलामीत जीवन पददलित समाजाच्या सामर्थ्यावर विश्वास दाखवून स्वतंत्र भारताचे जबाबदार नागरिक बनण्यास शिक्षणाच्या माध्यमातून त्यांना तयार केले. प्रस्तुत लघुशोध प्रबंधाची मांडणी करताना ऐतिहासिक संशोधन पध्दतींचा वापर केला आहे. संदर्भ साधनांचे प्राथमिक व दुय्यम असे वर्गीकरण करून त्यांचा वापर या प्रबंधात केला आहे.

या संशोधन अभ्यासासाठी पीपल्स एज्यूकेशन सोसायटी मधील अप्रकाशीत साधनांचा उपयोग केलेला आहे. या मध्ये आर.आर.भोळे, प्रा.व्ही.जी.राव,

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

एम.बी.चिटणीस,इ.च्या वैयक्तिक फायलींचा समावेश आहे. याचबरोबर पीपल्स एज्यूकेशन सोसायटीच्या सिध्दार्थ कला व शास्त्र महाविद्यालय, मुंबई, मिलींद महाविद्यालय, औरंगाबाद मधील उपलब्ध वार्षिक अंक, स्मरणिका, तसेच शिवाजी विद्यापीठाच्या पुरातत्व विभागातून मिळालेला बहिष्कृत हितकारिणी सभेचे वृतांत व शिवाजी विद्यापीठास सादर केलेले अप्रकाशित पी.एच.डी.प्रबंध, यांची मदत झाली आहे.

माझा हा लघुशोध प्रबंध वाचक व अभ्यासक यांना उपयुक्त ठरेल असे मला विश्वास वाटतो.

स्थळ : कोल्हापूर

दि. ३०/ ६ / २००५.

श्रीधर भाऊसाहेब शिंदे

# अनुक्रमणिका


| प्रकरण | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| पहिले | मागासवर्गीय समाजाची १९२० पुर्वीची शैक्षणिक स्थिती | १ ते २८ |
| दुसरे | डॉ.आंबेडकरांचे शैक्षणिक विचार | २९ ते ६४ |
| तिसरे | डॉ.आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांची फलश्रुती | ६५ ते ९२ |
| चौथे | डॉ.आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्यातील सहकारी आणि वृत्तपत्रे | ९३ ते ११९ |
| पाचवे | उपसंहार | १२० ते १३८ |
| | परिशिष्ट्ये | १३९ ते १४२ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | १४३ ते १४७ |